Remove Watermark Wondershare PDFelement

जळगाव दि. ९ (प्रतिनिधी) “कुलगुरू – विद्यार्थी संवाद पर्वात” कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी यांची शनिवार दि. ९ सप्टेंबर रोजी ८ विद्यार्थ्यांनी भेट घेवून आपल्या अडचणी व समस्या सांगितल्या.

नवीन शैक्षणिक वर्षातील कुलगुरू विद्यार्थी संवाद पर्वाचा प्रारंभ शनिवारी झाला. कुलगुरू प्रा. माहेश्वरी यांच्या दालनात विद्यापीठ प्रशाळा आणि संलग्नित महाविद्यालयांमधील विविध ८ विद्यार्थ्यांनी कुलगुरूंची भेट घेतली. लेखी निवेदन देवून त्यांनी कुलगुरूंकडे आपल्या समस्या मांडल्या. यामध्ये सोयी-सुविधा, विद्यापीठ परिसरातील कुत्र्यांचा सुळसुळाट, रिड्रेसलचे निकाल लवकरात लवकर लागावेत आदी मुद्यांचा समावेश होता. कुलगुरूंनी या विद्यार्थ्यांचे म्हणणे ऐकून घेतले व त्यांच्या शंकाचे समाधान केले. या वर्षात पुन्हा हे पर्व सुरू झाल्याबद्दल विद्यार्थ्यांनी आनंद व्यक्त केला व झालेल्या चर्चेनंतर समाधानही व्यक्त केले. यावेळी कुलसचिव डॉ. विनोद पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक प्रा. योगेश पाटील हे उपस्थित होते. दर महिन्याच्या दुसऱ्या शनिवारी दुपारी २:३० वाजता विद्यार्थ्यांना या उपक्रमातंर्गत थेट कुलगुरूंची भेट घेवून आपल्या अडचणी कानावर घालता येणार आहेत.

**बातमी क्रमांक २**

जळगाव दि. ९ (प्रतिनिधी) जागतिक आत्महत्या प्रतिबंध दिनानिमित्त कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या कला व मानव्यविद्या प्रशाळे अंतर्गत असलेल्या मानसशास्त्र विभागाच्यावतीने मनोविकार तज्ज्ञ डॉ. दिलीप महाजन यांचे व्याख्यान शनिवार दि. ९ सप्टेंबर रोजी व्याख्यान झाले.

मानसरंग, महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास अकादमी आणि विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम घेण्यात आला. डॉ. महाजन यांनी नैराश्य आणि आत्महत्येस कारणीभूत ठरणारी जैविक, मानसिक, सामाजिक कारणे सांगितली आणि विद्यार्थ्यांच्या शंकाचे समाधान केले. अध्यक्षस्थानी मानव्यविद्या प्रशाळेचे प्रभारी संचालक डॉ. आर. पी. भावसार होते. यावेळी डॉ. वीणा महाजन, विजय आहेर, डॉ. तुषार रायसिंग, डॉ. सुभान जाधव यांची उपस्थिती होती.

---

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी

Wondershare PDFelement